वर्ष- ३२ वे | अंक- ३५ वा | पाने- ४ | किंमत-रू.२/-

साप्ताहिक
# मुळशी दिनांक

मुख्य संपादक- स्व.दत्तात्रय सुर्वे

प्रति,

दि - १३ - १९ एप्रिल २०२५

- कार्यकारी संपादक -
श्री. केतन दत्तात्रय सुर्वे



बुद्धीमत्तेचा विकास हे, मानवी अस्तित्वाचे
अंतिम ध्येय असले पाहिजे
आंबेडकर जयंतीच्या
हार्दिक शुभेच्छा!

Postal Reg. No.PCW/119/2019-2021, Posted at Ex.servicemen Colony,Post Office. RNI No. MAHMAR/2003/9449. Publication Day-Sunday. Posting Day-Thursday

## रायगड हे केवळ पर्यटनस्थळ न राहता ते प्रेरणास्थळ बनावे : केंद्रीय गृह मंत्री अमित शाह

रायगड : छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ महाराष्ट्राचे नव्हे तर संपूर्ण जगाचे प्रेरणास्थान आणि आदर्श आहेत. त्यामुळे छत्रपती शिवरायांची राजधानी असलेले रायगड हे केवळ पर्यटनस्थळ न राहता ते प्रेरणास्थळ बनावे असे प्रतिपादन केंद्रीय गृह मंत्री अमित शाह यांनी केले.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३४५ व्या पुण्यतिथीनिमित्त केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आज किल्ले रायगडावर अभिवादन केले. राजसदरेवर श्री.शिवाजी रायगड स्मारक मंडळाच्या स्थानिक उत्सव समिती महाड यांच्यावतीने आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड.आशिष शेलार, महिला व बालविकास मंत्री कु. आदिती तटकरे, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्र राजे भोसले, रोहयो मंत्री भरत गोगावले, खा.उदयनराजे भोसले, खा.धैर्यशिल पाटील, आमदार सर्वश्री प्रशांत ठाकूर, रविशेठ



पाटील, महेश बालदी, प्रवीण दरेकर, विक्रम पाटील, विभागीय आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, जिल्हाधिकारी किशन जावळे, मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती नेहा भोसले, जिल्हा पोलीस अधिक्षक सोमनाथ घार्गे, श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळाचे अध्यक्ष रघुजीराजे आंग्रे, सुधीर थोरात, पांडुरंग बलकवडे आदि उपस्थित होते.

दरवर्षी स्मारक मंडळाच्या वतीने स्वराज्याचे साम्राज्यात रूपांतर होत असताना योगदान देणाऱ्या सरदार घराण्याचा सन्मान करण्यात येतो. यंदा होळकर घराण्याचा सन्मान करण्यात आला. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते उदयसिंह होळकर यांचा सन्मान करण्यात आला. तसेच सैन्य दल अधिकारी ले.जन. संजय कुलकर्णी यांचा सन्मान करण्यात आला. केंद्रीय गृहमंत्री श्री. शाह यांच्याहस्ते श्री शिवपुण्यस्मृती रायगड पुरस्कार दुर्ग अभ्यासक निलकंठ रामदास पाटील यांना प्रदान करण्यात आला. तसेच अशोक बांगर लिखित शिवरायमुद्रा' स्मरणिका प्रकाशन करण्यात आले.

यावेळी उपस्थित शिवप्रेमींशी संवाद साधताना श्री.शाह म्हणाले छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३४५ व्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचं भाग्य लाभलं . सुरुवातीलाच मी राजमाता जिजाऊंना मनःपूर्वक प्रणाम करतो. मी शिवचरित्र वाचलंय, त्यांनी छत्रपतींना फक्त जन्मच दिला नाही, तर स्वराज्य, स्वधर्म आणि स्वभाषेचा पुनरुद्धार करण्याची प्रेरणाही दिली. स्वतंत्र स्वराज्य निर्माण करण्याचा विचारही जिजाऊंनी बाल शिवाजींना दिला. हिंदवी स्वराज्याची राजधानी असलेल्या रायगड या ऐतिहासिक स्थळी शिवाजी महाराजांना प्रणाम करतांनाच्या माझ्या भावना वर्णन करू शकत नाही असेही ते म्हणाले.

दृढ इच्छाशक्ती, अगम्य साहस, अकल्पनीय रणनीत आणि समाजातील सर्व वर्गांना एकत्र करुन अपराजित सैन्याची स्थापना हे शिवरायां शिवाय कोणाला जमलं नाही. महाराजानंतर धर्मवीर संभाजी महाराज , महाराणी ताराबाई, धनाजी, संताजी यांनी औरंगजेब जिवंत असेपर्यंत त्याच्याशी लढा दिला. स्वतःला आलमगीर म्हणणाऱ्या औरंगजेबाची महाराष्ट्रात कबर बांधली गेली. भारतातील पुढच्या पिढीला हा इतिहास शिकवला गेला पाहिजे. सातवी ते बारावीचा प्रत्येक विद्यार्थी एकदा या पुण्यस्थळी यावा यासाठी धोरण बनवावं अस मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना चर्चे दरम्यान सांगितले असल्याचेही श्री.शाह यांनी यावेळी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार आणि बाबासाहेब आंबेडकरांचे संविधान घेऊन सरकार पुढे जात आहे. महाराजांच्या बारा किल्ल्यांचा जागतिक वारसा स्थळांमध्ये समावेश व्हावा, यासाठी युनेस्को कडे प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. यासाठी युनेस्को परिषदेत सादरीकरण करण्यासाठी मी आणि सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार जाणार आहोत.

यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे,खासदार उदयनराजे भोसले यांनीही विचार व्यक्त केले.

या सर्व कार्यक्रमानंतर केंद्रीय गृहमंत्री श्री.शाह आणि उपस्थित सर्व मान्यवर यांनी जगदीश्वर मंदिरात जाऊन दर्शन घेतले. तसेच समाधी स्थळ येथे भेट देऊन अभिवादन केले. यावेळी समाधी स्थळावर हेलिकॉप्टर द्वारे पुष्प वृष्टी करण्यात आली. तसेच रायगड पोलीस दलाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांना शासकीय मानवंदना देण्यात आली.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळाचे अध्यक्ष रघुजीराजे आंग्रे यांनी केले तर सूत्र संचलन मोहन शेटे यांनी केले. या कार्यक्रमाला विविध विभागांचे शासकीय अधिकारी, कर्मचारी, पत्रकार तसेच शिवभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शासनाच्या जनकल्याणकारी योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी आवश्यक: मंत्री संजय शिरसाट

पुणे (प्रतिनिधी): केंद्र व राज्य शासनातर्फे जनकल्याणाच्या विविध योजना सुरू असून, या योजनांचा लाभ ग्रामीण भागातील लाभार्थ्यांपर्यंत पोचण्यासाठी संबंधित यंत्रणांनी योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करुन गरजू लोकांना लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न करावे. असे प्रतिपादन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री संजय शिरसाट यांनी केले.

यशदा येथे नीती आयोग व महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'भारतात सहाय्यक तंत्रज्ञानासाठी परिसंस्था विकसित करणे' या विषयावरील कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी मंत्री शिरसाट बोलत होते.

या कार्यशाळेस नीती आयोगाचे सदस्य व्ही. के. पॉल, राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक (दूरदृष्यप्रणालीद्वारे), नीती आयोगाचे वरिष्ठ सल्लागार डॉ. राजीव कुमार सेन, यशदाचे महासंचालक निरंजन कुमार सुधांशू, नीती आयोगाचे सहसचिव के. एस. रेजिमन उपस्थित होते.

मंत्री शिरसाट पुढे म्हणाले, दिव्यांग बांधवांना आवश्यक साधने उपलब्ध करुन त्यांचा सामाजिक विकास करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे आवश्यक आहे. समाजातील गरजूंना मदत करुन त्यांच्यापर्यंत लाभ पोहोचले पाहिजे, तसेच समाजासाठी आपल्याला काही करता येईल का त्या दृष्टने



प्रयत्न केले जावेत, गरजू व गरीब लोकांना मदत केल्याचे समाधान खूप मोठे असून त्यासारखे दुसरे समाधान नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे सक्षम भारत, समृद्ध भारत हे स्वप्न साकार करण्याच्या दृष्टीने या कामात सर्वांनी सहभाग नोंदवावा, असे त्यांनी सांगितले. सहाय्यक तत्रज्ञान उद्योगांच्या देशांतर्गत क्षमतेचे महत्व आणि समावेशकतेला प्रोत्साहन देण्याबाबत भूमिका अधोरेखित केली.

नीती आयोगाचे सदस्य व्ही.के.पॉल आपल्या मनोगतात म्हणाले, विकसित भारत २०४७ या दृष्टिकोनातून सामाजिक सामावेशासाठी महत्वपूर्ण असलेल्या सहाय्यक तंत्रज्ञानासाठी एक पर्यावरणीय प्रणाली विकसित करण्याच्या गरजेवर भर दिला.

राज्याच्या मुख्य सचिव सौनिक म्हणाल्या, सहाय्यक तंत्रज्ञान उत्पादने आणि उपक्रमांची आवश्यकता, सहाय्यक तंत्रज्ञान पर्यावरणीय प्रणालीला प्रोत्साहन देण्यासाठी महाराष्ट्र राज्याने घेतलेल्या विविध उपक्रमांबाबत माहिती दिली.

नीती अयोगाचे वरिष्ठ सल्लागार डॉ. राजीव कुमार सेन यांनी मनोगत व्यक्त केले. दिवसभर चालणाऱ्या या कार्यशाळेत विविध विषयांवरील तीन सत्रांचा समावेश करण्यात आला होता.

समारोप सत्रात केंद्रीय सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण राज्यमंत्री रामदास आठवले यांनी कार्यशाळेत सहभागी प्रतिनिधींना संबोधित केले आणि समावेशक समाज निर्माण करण्याचे महत्त्व अधोरेखित केले.

कार्यशाळेत पहिल्या सत्रात ''भारतात सहाय्यक तंत्रज्ञानाची उपलब्धता सुधारणे'' यावर लक्ष केंद्रित केले गेले. या सत्रात अपंग व्यक्ती (पीडब्ल्यूडी), वृद्ध आणि इतर उपेक्षित समुदायांसाठी सहाय्यक तंत्रज्ञान अधिक सुलभ बनवण्यात परिवर्तनकारी भूमिका बजावणारे प्रमुख सरकारी उपक्रम, धोरणे आणि आंतर-क्षेत्रीय सहकार्य कसे आहे यावर चर्चा झाली.

''सहाय्यक तंत्रज्ञान उत्पादन आणि जागतिक सहकार्य'' यावर लक्ष केंद्रित करणाऱ्या सहाय्यक तंत्रज्ञान कार्यशाळेच्या तिसऱ्या सत्रात सहाय्यक तंत्रज्ञानासाठी मजबूत देशांतर्गत उत्पादन आधार वाढवण्याचे महत्त्व आणि जागतिक भागीदारीचे प्रचंड मूल्य अधोरेखित केले.

या कार्यशाळेस गोवा, केरळ, महाराष्ट्र, ओडिशा, पंजाब, तेलंगणा आणि तामिळनाडू या राज्य सरकारांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

## सेवा हक्क दिनानिमित्त विविध उपक्रम राबविण्याचे राज्य आयुक्त दिलीप शिंदे यांचे आवाहन



पुणे (प्रतिनिधी) : २८ एप्रिल रोजी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम अंमलबजावणीस १० वर्षे पूर्ण होत आहेत. त्या औचित्याने अधिनियमाच्या जनजागृतीसाठी २८ एप्रिल हा दिवस जिल्हा व ग्रामस्तरावर विविध कार्यक्रमाचे आयोजन करुन सेवा हक्क दिन साजरा करावा, असे आवाहन राज्याचे सेवा हक्क आयोगाचे आयुक्त दिलीप शिंदे यांनी केले आहे.

विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित बैठकीत ते बोलत होते. यावेळी विभागीय आयुक्त डॉ.चंद्रकांत पुलकुंडवार,आयोगाच्या उप सचिव अनुराधा खानविलकर, अपर आयुक्त अरुण आनंदकर, उपायुक्त विजय मुळीक, नितीन माने, दत्तात्रय लांघी, तसेच पुणे विभागातील सातारा, सोलापूर, कोल्हापूर, सांगली व पुणे जिल्ह्याचे जिल्हाधिकारी,मुख्य कार्यकारी अधिकारी, महानगरपालिकेचे अधिकारी दूरदृष्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

आयुक्त श्री.शिंदे म्हणाले, राज्यातील नागरिकांना दिल्या जाणाऱ्या सेवा पारदर्शक गतीमान व कालबध्द पध्दतीने देण्याकरिता २८ एप्रिल २०१५ रोजी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंमलात आला आहे. या अधिनियमांतर्गत ९६९ सेवा अधिसूचित करण्यात आल्या असून त्या पैकी ५३६ सेवा ऑनलाईन उपलब्ध आहेत. अधिनियमाचा प्रभावी वापर झाल्यास नागरिकांचे जीवन सुकर करण्यास मदत होईल .अधिनियमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी घरपोच सेवा देणारा सेवादूत उपक्रम,ग्रामपंचायत स्तरावरील आपले सरकार सेवा केंद्रा मार्फत शासनाच्या सर्व विभागांच्या अधिसूचित सेवा उपलब्ध करुन देणे, सर्व शासकीय कार्यालयांत व आपले सरकार केंद्रांवर सेवा शुल्क व कालमर्यादा यांची माहिती देणारे व तक्रार नोंदविणेसाठी क्यू आर कोड उपलब्ध करुन देणे, आपले सरकार सेवा केंद्र सुरु करणे, उत्कृष्ट कार्य करणाऱ्या अधिकाऱ्यांचा गौरव करणे आदी उपक्रम जिल्हधकारी यांनी त्यांचे जिल्ह्यांमध्ये राबवावेत, अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

विभागीय आयुक्त डॉ.पुलकुंडवार यांनी सेवा हक्क अधिनियमांतर्गत अधिसूचित करण्यात आलेल्या सेवांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचण्याची प्रभावी अंमलबजावणी करावी अशा सूचना देऊन सर्व सेवा नागरिकांपर्यंत पोहोचवणे म्हणजेच खऱ्या अर्थाने नागरिकांचे जीवनमान सुकर करण्यास मदत होणार असल्याचे सांगितले.

# व्यापार युद्धाचा भडका

भारतासह अनेक देशांवर भरमसाठ आयातशुल्क लादण्याची घोषणा करून अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी व्यापारयुद्धाचा शंखनाद केला आहे. गेला महिनाभर याच मुद्द्यावरून डरकाळ्या फोडत असलेले ट्रम्प यांनी भारतीय मालावर २६ टक्के, चिनी मालावर ३४ टक्के, तर युरोपीय देशांवर २० टक्के आयातशुल्क लागू केले.

'सारे जग अमेरिकेची पिळवणूक करते,' हा ट्रम्प महाशयांचा आवडता सिद्धांत असून, आता सर्वांना 'जशास तसे' उत्तर देण्यासाठी त्यांनी आयातशुल्काचे हत्यार उपसले आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, हा अमेरिकेसाठी 'लिबरेशन डे' आहे; परंतु त्यांच्या या फटक्याने जगभरात उलथापालथ सुरू झाली आहे. भारतासह अनेक देशांतील संबंधित उद्योगांचे धाबे दणाणले असून, जगभरातील वित्तीय बाजारांमध्ये भूकंपाचे लहानमोठे धक्के बसत आहेत. भारतातही माहिती तंत्रज्ञान व अन्य काही कंपन्यांचे समभाग घसरले; मात्र या निर्णयातून औषधांचे क्षेत्र वगळल्याने या उद्योगाला सध्या तरी दिलासा मिळाला आहे. 'भारत हा कठोर देश आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आपले मित्र असले, तरी अमेरिकेशी योग्य पद्धतीने वागत नाहीत,' असे सांगून ट्रम्प यांनी भारताला काही सवलतींसह कर लादल्याचा आवही आणला. त्यांच्या या घोषणेमुळे भारतातील वाहन व सुटे भाग, कपडे, धातू, रत्ने व इलेक्ट्रॉनिक अशा विविध उद्योगांना फटका बसण्याची भीती आहे.

अमेरिकेच्या आयातशुल्काबाबत अनेक देशांनी कडक प्रतिक्रिया दिली आहे. भारताने अद्याप याबाबत अधिकृत भूमिका मांडलेली नाही. या तरतुदींचा अभ्यास करून देशाचे पुढील धोरण निश्चित करण्यात येणार असे दिसते. या स्थितीत भारतापुढे पर्याय काय, याबाबत चर्चा सुरू आहे. व्यापार विभागाची अमेरिकेशी चर्चा सुरू असून त्यामध्ये अमेरिकी मालावरील आयातशुल्क घटविण्याचा, किंवा भविष्यात संरक्षण व ऊर्जा क्षेत्रात अमेरिकी आयात वाढविण्याचा मार्ग पुढे येऊ शकतो.

ट्रम्प टीका करीत असले, तरी भारताने लागू केलेले आयातशुल्क जागतिक व्यापार करारानुसारच आहे, असेही काही अभ्यासकांचे मत आहे. त्यामुळे अमेरिकेपुढे न झुकता भारतानेही 'जशास तसे' उत्तर द्यावे, अशी मागणी होत आहे. मात्र, अमेरिकेशी असलेले द्विपक्षीय संबंध पाहता तसे होण्याची शक्यता कमी दिसते. ट्रम्प यांच्या या शुल्कवाढीच्या अस्त्रामुळे जगभरात व्यापारयुद्धाचा भडका उडणार, असे चित्र सध्या तरी आहे. भारतानेही अशा लहरी धोरणांवर हेलकावे घेण्यापेक्षा कोणा एकावर विसंबून न राहता नवनव्या देशांतील बाजारपेठांचा शोध घेणेच फायदेशीर ठरेल.

# महाळुंगे मेट्रो स्टेशनच्या नामकरणासाठी ग्रामस्थांचा पुढाकार; फलक लावून अनावरण




मुळशी (महाळुंगे) : माण-हिंजवडी ते शिवाजी महाराजनगर दरम्यान उभारण्यात येत असलेल्या मेट्रो मार्गावरील स्टेशन क्रमांक १० हे महाळुंगे गावाच्या हद्दीत असूनही या स्टेशनच्या नावात वारंवार अन्याय कारक व चुकीचा उल्लेख केला जात आहे. या विरोधात ग्रामस्थांनी आवाज उठवत, स्टेशनला 'महाळुंगे मेट्रो स्टेशन' असे नामकरण करण्यात यावे, अशी जोरदार मागणी केली.

ग्रामस्थांच्या पुढाकाराने आणि 'म्हाळुंगे क्रिडानगरी'च्या वतीने स्टेशन क्रमांक १० च्या ठिकाणी 'महाळुंगे मेट्रो स्टेशन' असे नाव असलेले फलक लावण्यात आले आणि अनावरण करण्यात आले. यावेळी पोलीस पाटील शांताराम पाडाळे, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे जिल्हा संघटक संतोषदादा मोहोळ, सरपंच मयूर भांडे, माजी उपसरपंच काळुराम गायवाड, सामाजिक कार्यकर्ते लक्ष्मण पाडाळे, माजी उपसरपंच युवराज कोळेकर यांच्यासह तुषार हगवणे, रणजित पाडाळे, पांडुरंग पाडाळे, ज्ञानेश्वर पाडाळे, रितेश पाडाळे, अभि शेडगे, दत्ता मेटकरी आदी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ग्रामस्थांनी यावेळी सांगितले की, "मेट्रो स्टेशन क्रमांक १० पूर्णतः महाळुंगे गावाच्या हद्दीत आहे. तरीही या स्टेशनच्या नावात गावाचे नाव न घेता इतर भागांचा उल्लेख केला जात आहे. ही बाब ग्रामस्थांच्या भावना दुखावणारी आहे. मेट्रो प्रशासनाने ग्रामस्थांच्या भावना लक्षात घेऊन 'महाळुंगे मेट्रो स्टेशन' असे अधिकृत नामकरण तातडीने करावे."

या निमित्ताने गावकऱ्यांनी एकजूट दाखवत गावाच्या अस्मितेसाठी ठाम भूमिका घेतली. यामुळे महाळुंगे गावात मेट्रो स्टेशनच्या नावाबाबत जनजागृती वाढली असून, प्रशासनाने लवकरात लवकर योग्य तो निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# रस्त्याच्या कामाला गती;पिंपळोली जोडरस्त्यामुळे मावळ-मुळशीतील नागरिकांत समाधान



पिरंगुट (प्रतिनिधी) : मावळ आणि मुळशी तालुक्याला जोडणाऱ्या पिंपळोली (ता. मुळशी) येथील महत्त्वपूर्ण रस्त्याच्या कामाला अखेर गती मिळाल्याने स्थानिक ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. या रस्त्यामुळे दोन्ही तालुक्यांमधील दळणवळण सुकर होणार असून, गेल्या अनेक वर्षांपासूनची नागरिकांची मागणी पूर्णत्वास येत असल्याने समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

पंतप्रधान सडक योजनेअंतर्गत या रस्त्याचे काम होत असून, यासाठी खासदार सुप्रिया सुळे यांच्या पाठपुराव्यामुळे सुमारे ६.५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या रस्त्याच्या कामासाठी पिंपळोलीचे माजी सरपंच बाबाजी शेळके यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता. तसेच जिल्हा परिषदेचे तत्कालीन उपाध्यक्ष रणजित शिवतरे आणि तत्कालीन जिल्हा परिषद सदस्य शंकर मांडेकर यांनीही या रस्त्याच्या मंजुरीसाठी प्रयत्न केले होते.

मुळशी तालुक्यातील रिहे खोऱ्यातून मावळ तालुक्यातील पाचाणे, पुसाणे, तसेच इतर गावांमध्ये जाण्यासाठी नागरिकांना यापूर्वी सुमारे ३५ किलोमीटरचा वळसा घालावा लागत होता. मात्र, या नव्या रस्त्यामुळे प्रवासात मोठी बचत होणार असून, मावळ व मुळशीतील कुटुंबीयांच्या सोयरिक, धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये उपस्थित राहणे अधिक सुलभ होणार आहे.

या रस्त्याचा पूर्वीचा स्वरूप कच्चा होता आणि खिंडीतून जाणारा असल्याने पावसाळ्यात दरवर्षी रस्ता वाहून जात असे, त्यामुळे स्थानिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत होते. विशेष म्हणजे गेली दहा वर्षे सलग महाशिवरात्रीच्या दिवशी बाबाजी शेळके स्वतःच्या खर्चाने या रस्त्याची तात्पुरती दुरुस्ती करत होते.

सध्या या रस्त्याचे काम वेगाने सुरू असून, ग्रामस्थ व लोकप्रतिनिधी कामाच्या ठिकाणी प्रत्यक्ष उभे राहून कामाची पाहणी करत आहेत. येत्या काही महिन्यांत हा रस्ता पूर्णत्वास जाईल अशी अपेक्षा असून, स्थानिक नागरिकांसाठी ही मोठी दिलासादायक बाब ठरणार आहे.

# गॅस दरवाढ आणि कर्जमाफीप्रश्नी राष्ट्रवादी काँग्रेसचे निषेध आंदोलन



पौड (प्रतिनिधी) : केंद्र आणि राज्य सरकारच्या शेतकरीविरोधी धोरणांप्रती निषेध व्यक्त करत राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) पक्षाच्यावतीने पौड येथील तहसील कार्यालयासमोर जोरदार आंदोलन करण्यात आले. शेतकऱ्यांच्या कर्जमाफी संदर्भातील वादग्रस्त वक्तव्ये, तसेच घरगुती गॅस सिलेंडरच्या दरात झालेली भरमसाट वाढ, याचा तीव्र निषेध कार्यकर्त्यांनी केला.

यावेळी पक्षाचे तालुकाध्यक्ष महादेव कोंढरे, सविता दगडे, दगडूकाका करंजावणे, राहुल पवळे, कोमल वाशिवले, विलास अमराळे, रूपाली अमराळे, सविता कालेकर, संभाजी कालेकर, भरत सातपुते, शशिकांत नांगरे, अनिल आटाळे, सारिका वैद्य, राखी येनपुरे यांच्यासह अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी बोलताना महादेव कोंढरे म्हणाले, "महायुती सरकारने निवडणूक काळात सरसकट कर्जमाफीचे गाजर दाखवले होते. मात्र प्रत्यक्षात शेतकऱ्यांची परिस्थिती दिवसेंदिवस बिकट होत चालली आहे. हमीभाव नाही, पीकविमा वेळेवर मिळत नाही आणि निसर्गाच्या लहरीपणामुळे शेती उद्ध्वस्त होत आहे. अशातच कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनी 'सरसकट कर्जमाफी शक्य नाही' असे म्हणत शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्याचे काम केले आहे."

महिला आघाडीच्या नेत्या सविता दगडे म्हणाल्या, "घरगुती गॅस सिलेंडरच्या दरात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. गॅस दरवाढ ही केवळ आर्थिक प्रश्न नाही, तर ती आजच्या गृहिणींच्या जगण्याशी निगडित बाब आहे. महागाईमुळे घर चालवणे कठीण झाले आहे. सामान्यांचा आवाज उठवण्यासाठी आम्ही रस्त्यावर उतरलो आहोत."

या आंदोलनादरम्यान निषेधाचे फलक, घोषणा आणि निवेदनाद्वारे सरकारच्या धोरणांचा विरोध करण्यात आला. तहसीलदारांमार्फत सरकारला निवेदनही देण्यात आले. सरकारने जर लवकरात लवकर शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी दिली नाही आणि गॅस दरवाढ मागे घेतली नाही, तर राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने जिल्हाभर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा यावेळी देण्यात आला.

# हिंजवडीत बगाड मिरवणुकीला भक्तांचा महापूर



हिंजवडी (प्रतिनिधी): हिंजवडी वाकडकरासंह जिल्ह्यातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेले ग्रामदैवत श्री म्हातोबा देवाच्या उत्सवा निमित्ताने हिंजवडीतून निघालेल्या बगाड मिरवणुकीला यंदाही भाविकांचा अथांग जनसागर लोटला.

हिंजवडीपासूनच वाकडच्या मंदिरात पोहचेपर्यंत जागोजागी बगाड रथावर केलेली पुष्पवृष्टी भाविकांच्या डोळ्यांचे पारणे फेडणारी ठरली. रुढी परंपरेनुसार जांभूळकर घराण्यातील सोमनाथ सखाराम जांभुळकर यांना यंदाचा गळकरी होण्याचा मान मिळाला. तर गणेश संतोष साखरे व सूरज दत्तात्रय साखरे यांना खांदेकऱ्याचा बहुमान मिळाला. विजय हुलावळे यांना काठीचा मान मिळाला.

यावेळी चांगभलं बोला चांगभलं.... म्हातोबाच्या नावानं चांगभलं... या जयघोषाने आयटीपंढरी दुमदुमली होती. भाविकांनी खोबर, भंडाऱ्याची उधळण केली. यावेळी गळकऱ्याला बागडावर बसवून गोलाकार रिंगण घेतले. त्यानंतर मिरवणूक वाकडच्या दिशेने मार्गस्थ झाली.

मिरवणुकीपूर्वी सायंकाळी पाच वाजता किसन साखरे पाटील यांनी गळकऱ्याच्या निवडीची घोषणा केली. त्यानंतर मारुतीरायचे दर्शन घेऊन वाजंत्र्यांच्या निनादात गळकऱ्याला गावठाणातील म्हातोबा मंदिरात आणण्यात आले. त्यास मळवट भरण्यासाठी महिलांनी एकच गर्दी केली. स्नान घालून होळी पायथ्याजवळ आणले. तिथे संदीप साखरे, राहुल साखरे व पांडुरंग सुतार यांनी गळकऱ्याला गळ टोचला.

यावेळी हातातील काठी उंचावून होणाऱ्या काठी नादाने आयटीनगरी दुमदुमली. गळकरी, खांदेकऱ्यांचे पाय धुण्यासाठी महिलांनी पुन्हा गर्दी केली. गळकरी सोमनाथला आणल्यानंतर बगाडावर बसवून गोल रिंगण घातले. हा सोहळा गळऱ्याला म्हातोबा मंदिरात अभंग अनुभवण्यासाठी २०-२५ हजार भाविकांनी गर्दी केली होती.

बैलजोड्या जुंपण्यासाठी चुरस-

हिंजवडी वाकडमधील शेकडो शेतकऱ्यांनी आवड म्हणून घरी खिल्लारी बैल पाळले आहेत. सजवलेल्या बैलजोड्या या बगाड मिरवणूक रथाला जोडण्यासाठी जीवन जांभुळकर, धोंडिबा जांभुळकर, बाळासाहेब बेंद्रे, मल्हारी साखरे, उमेश साखरे, गौरव गणेश साखरे, चेतन साखरे, अरुण साखरे, राजेंद्र जांभूळकर, मनोज साखरे, नवनाथ वसंत बोडके, तानाजी साखरे, आण्णा साखरे, गिरीश शेडगे यांच्यासह अनेकांच्या बैलजोड्या मिरवणूक रथापुढे जुंपण्यासाठी एकमेकांमध्ये चढाओढ लागली होती.

यंदाच्या बगाड मिरवणुकीवर जेसीबी, क्रेनमधून पुष्पवृष्टी करण्यात आली. रंगीबेरंगी फटाक्यांची आतिषबाजी करून सप्तरंगाची उधळण करण्यात आली. हा नेत्रदीपक सोहळा यंदाच्या मिरवणुकीचे विशेष आकर्षण ठरला.

# शेतकऱ्यांविरोधातील वक्तव्यावरून शिवसेनेचे मुळशी येथे जोडे मारो आंदोलन

मुळशी (प्रतिनिधी): नाशिक येथे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी शेतकऱ्यांविरोधात केलेल्या बेताल वक्तव्याचा निषेध करत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) मुळशी तालुका वतीने घोटावडे फाटा येथे सोमवारी ''जोडे मारो'' आंदोलन छेडण्यात आले.



या आंदोलनात शिवसेना जिल्हा प्रमुख प्रकाश भेगडे, शिवा आरोग्य सेना पुणे जिल्हा प्रमुख आबासाहेब शेळके, पुणे जिल्हा समन्वयक भानुदास पानसरे, महिला आघाडी सह संपर्क संघटक स्वाती ढमाले, जिल्हा संघटक संगीता पवळे, तालुकाप्रमुख सचिन खैरे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक राम गायकवाड, शिवा आरोग्य सेना तालुका अध्यक्ष ज्ञानेश्वर डफळ, युवा सेना तालुका अधिकारी राम गवारे, उपतालुका प्रमुख अनंता वाशिवले, राजाभाऊ शेळके, कालिदास शेडगे, अनिल आधवडे, लहू लायगुडे, शंकर सुतार (प्रभारी सरपंच, कासार आंबोली), दत्ताभाऊ काळभोर, शिवाजी बलकवडे, संदीप आमले, रामदास पोळेकर, राणी शिंदे, दिलीप मारणे, संभाजी ढमाले, सचिन ढमाले, मिथुन खिलारी, किशोर गायकवाड, अरुण विर, नितीन लोयरे, आदी पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या आंदोलनाच्या माध्यमातून उपस्थितांनी कृषिमंत्र्यांच्या वक्तव्याचा तीव्र निषेध व्यक्त करत, शेतकऱ्यांचा अपमान खपवून घेतला जाणार नाही असा इशारा दिला. आंदोलन शांततेत पार पडले.

## ग्रामपंचायत माण ,ता.मुळशी,जि.पुणे

### ई-निविदा अंतर्गत बी-१ खुली निविदा सूचना क्र.१ सन २०२५-२६

**ग्रामपंचायत माण, ता.मुळशी, जि.पुणे** यांचेतर्फे सार्वजनिक बांधकाम विभाग/जि.प. पुणे/ महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदार यांजकडून दोन लिफाफा पद्धतीने खालील कामाची सीलबंद ई-निविदा दि.१०/०४/२०२५ रोजी सकाळी ११:०० वा ते दि. १७/०४/२०२५ चे दुपारी ०१:०० वाजेपर्यंत ऑनलाइन पद्धतीने ई-निविदा मागविण्यात येत आहे. या कामाचे विविध प्रपत्र https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आले आहे. सदर निविदा प्रपत्र, अटी, शर्ती इ. सदर संकेतस्थळावरून ई-निविदा दि.१०/०४/२०२५ रोजी सकाळी ११:०० वा ते दि.१७/०४/२०२५ चे दुपारी ०१:०० वाजेपर्यंत अधिगृहीत (Download) करून ऑनलाइन पद्धतीने सादर करता येतील. सदर निविदा प्रक्रिया ई-निविदाद्वारे ऑनलाइन पद्धतीने संगणकीय आज्ञावलीत होईल. सदर निविदे संदर्भातील निविदा नोटीस प्रसिद्धी, सूचना, शुद्धीपत्रके इत्यादीची माहिती https://mahatenders. gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
कामाचा तपशील खालीलप्रमाणे :

| अ.क्र | कामाचे नाव | निविदा रक्कम रु. | निविदा फी रुपये | इसारा रक्कम रुपये | काम पूर्ण करवयाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | माण येथील माण हिंजवडी मुख्य रस्त्याच्या कडेला भोसलेवस्ती व साळुंखेवस्ती साठी ६३० के. व्ही. क्षमतेचा नवीन ट्रान्सफॉरमर बसविणे. | ६७,१५,३४९/- | ४,७२०/- | ६७,१५३/- | १२ महिने |
| २ | माण येथील माणदेवी मंदिर ते साळुंखेवस्ती पर्यंत एल.टी. लाइन भूमिगत करणे. | १८,६९,२३३/- | १,१८०/- | १८,६९२/- | १२ महिने |
| ३ | ग्रामपंचायत माण येथील शिवेचा ओढा ते बाप्पुजीबुवा मंदिरापर्यंत हिंजवडी-माण- घोटावडे मुख्य रस्त्याच्या कडेने बसविणेत आलेल्या एल.ई.डी. स्ट्रीट लाइट पोलला एल.ई.डी. तिरंगा लाइट बसविणे. | ११,३२,७२५/- | ११८०/- | ११,३२७/- | ०६ महिने |

टिपः-१) कोणत्याही निविदा नाकारण्याचा अधिकार ग्रा.पं.ने राखून ठेवले आहेत.

सही/-
**ग्रामविकास अधिकारी**
ग्रामपंचायत माण, ता.मुळशी, जि.पुणे

सही/-
**सरपंच**
ग्रामपंचायत माण, ता.मुळशी, जि.पुणे

## ग्रामपंचायत माण ,ता.मुळशी,जि.पुणे

### बी.१ निविदा अंतर्गत निविदा सूचना क्र.०१ सन २०२५-२६

**ग्रामपंचायत माण,ता.मुळशी,जि.पुणे** यांचेतर्फे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सार्वजनिक बांधकाम विभाग व जि.प.पुणे यांचेकडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत बांधकाम कंत्राटदार यांजकडून दोन लिफाफा पद्धतीने खालील कामांच्या सीलबंद निविदा ठेकेदारांकडून २ पाकिटे पद्धतीने निविदा मागविणेत येत आहे. कोऱ्या निविदांचा नमुना ग्रा.पं.माण ता. मुळशी, जि. पुणे यांच्याकडून दि. १०/०४/२०२५ सकाळी १०:३० ते दि. १७/०४/२०२५ रोजी सायंकाळी ०५:०० वाजेपर्यंत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी (सकाळी १०.३० सायंकाळी ५:०० वाजेपर्यंत देण्यात येतील व भरून पाठविलेल्या मोहोरबंद निविदा दि. १०/०४/२०२५ सकाळी १०:३० ते दि. १७/०४/२०२५ रोजी सायंकाळी ०५:०० वाजेपर्यंत ग्रा.पं. कार्यालय माण येथे स्वीकारल्या जातील व प्राप्त झालेल्या विकासकामांच्या निविदा दि. १८/०४/२०२५ सकाळी ११:०० वा. ग्रा.पं. कार्यालयात उघडण्यात येतील.
कामाचा तपशील खालीलप्रमाणे :

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजित तरतूद रक्कम रुपये | इसारा रक्कम रुपये | निविदा फी रुपये | काम पूर्ण करावयाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | माण ठाकरवस्ती येथील सोपान ज्ञानोबा ठाकर यांच्या मिळकती जवळ भू-गटार लाइन टाकणे. | ४,२१,६७२/- | ४,२१७/- | ५९०/- | ६ महिने |
| २ | माण भोईरवाडी येथील पांडुरंग सावंत, ज्ञानेश्वर सावंत आणि उध्दव भोईर यांच्या मिळकती पासून मुख्य भू-गटार लाइनपर्यंत भू-गटार लाइन टाकणे. | ८,३७,१४२/- | ८,३७१/- | ५९०/- | ६ महिने |
| ३ | माण येथील शिवाजी कसाळे यांच्या मिळकती पासून ते डीएलएफ रस्त्यापर्यंत पावसाचे पाणी वाहून नेण्यासाठी पाइप लाइन टाकणे. | ८,४२,१७४/- | ८,४२१/- | ५९०/- | ६ महिने |
| ४ | माण भोईरवाडी जय गणेश कॉलनी येथील शंकर पोपट भोईर, आणि दत्तात्रय साठे यांच्या मिळकती पासून ते मुख्य भू-गटार लाइनपर्यंत भू-गटार लाईन टाकणे. | ८,३३,६३१/- | ८,३३६/- | ५९०/- | ६ महिने |
| ५ | माण पारखीवस्ती येथील सतिश सोपान पारखी यांची मिळकत ते मुख्य भू-गटार लाइनपर्यंत भू-गटार लाइन टाकणे. | २,२८,०४७/- | २,२८०/- | ५९०/- | ६ महिने |
| ६ | माण राक्षेवस्ती येथील आनंद राक्षे, भामाबाई राक्षे, आणि मोहन राक्षे यांची मिळकत ते मुख्य भू-गटार लाइनपर्यंत भू-गटार लाइन टाकणे. | ४,२३,३९५/- | ४,२३४/- | ५९०/- | ६ महिने |

टिपः-१)कोणत्याही निविदा नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवले आहेत. २) कोऱ्या निविदा नमुन्याची फी ग्रापंचायत कार्यालायत भरून निविदा उपलब्ध करून घ्याव्यात. ३) कोरी निविदा मागणी अर्जासोबत ठेकेदाराचा प्रमाणित नोंदणी दाखला जोडावा लागेल. ४)मूल्यांकन (एम.बी) पुर्ततेनंतरच देयक अदा केले जाईल.

सही/-
**ग्रामविकास अधिकारी**
ग्रामपंचायत माण, ता.मुळशी, जि.पुणे

सही/-
**सरपंच**
ग्रामपंचायत माण, ता.मुळशी, जि.पुणे

# वेल्हे (राजगड) येथे 'शासन आपल्या दारी' उपक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद



पुणे ग्रामीण (वेल्हे) पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री व राज्याचे उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली आणि आमदार श्री. शंकरभाऊ मांडेकर यांच्या पुढाकाराने वेल्हे तालुक्यातील अनुशंकर मंगल कार्यालय, आंबी फाटा येथे पार पडलेल्या 'शासन आपल्या दारी' उपक्रमास नागरिकांचा उदंड प्रतिसाद लाभला. या उपक्रमात १४०० पेक्षा अधिक लाभार्थ्यांनी सहभाग नोंदवून विविध शासकीय सेवा व योजनांचा लाभ घेतला.

मतदारसंघातील नागरिकांच्या थेट भेटी घेत, त्यांच्या समस्या जाणून घेऊन त्याचे तात्काळ निरसन व्हावे यासाठी हा उपक्रम हाती घेण्यात आल्याचे आमदार शंकरभाऊ मांडेकर यांनी सांगितले. उपक्रमादरम्यान अनेक नागरिकांनी विविध समस्यां विषयी मांडणी केली. प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत त्वरित कारवाईचे निर्देश देण्यात आले. यामुळे उपस्थित नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

उपक्रमात जन्म, जात, उत्पन्न, रहिवासी इत्यादी प्रमाणपत्रांचे वाटप, तसेच वृद्धापकाळ, अपंगत्व, शिष्यवृत्ती, रेशनकार्ड, किसान सन्मान योजना, पीएम आवास योजना, महात्मा फुले जन आरोग्ययोजना, जल जीवन मिशन अशा अनेक योजनांचा लाभ एकाच ठिकाणी देण्यात आला. या माध्यमातून नागरिकांचे अनेक प्रशासकीय कामकाज सोपे झाले.

या कार्यक्रमाला आमदार श्री. शंकरभाऊ मांडेकर, भोर उपविभागीय अधिकारी डॉ.विकास खरात, वेल्हे उपविभागीय अधिकारी महेश हरिश्चंद्रे, वेल्हे तहसीलदार श्रीनिवास ढोणे, गटविकास अधिकारी पंकज शेळके, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष किरण राऊत, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य अमोल नलावडे, कात्रज दूध संघाचे माजी अध्यक्ष भगवान पासलकर, अनंता दारवटकर, किर्तीताई देशमुख, सुनील जागडे, तसेच विविध विभागांचे खाते प्रमुख, आजी-माजी पदाधिकारी आणि मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

हा उपक्रम म्हणजे शासनाची सेवा थेट गावकऱ्यांच्या दारी आणण्याचे प्रभावी उदाहरण ठरले. नागरिकांनी दिलेल्या प्रतिसादामुळे हा उपक्रम यशस्वी ठरल्याचे आयोजकांनी सांगितले.

# सर्वपक्षीय शेतकरी विकास पॅनलचे संत तुकाराम कारखान्यावर वर्चस्व



हिंजवडी (प्रतिनिधी): मुळशी, मावळ ,खेड,हवेली व शिरूर या पाच तालुक्यांचे कार्यक्षेत्र असलेल्या कासारसाईतील श्री संत तुकाराम सहकारी साखर कारखान्याच्या पंचवार्षिक निवडणुकीत कारखान्याचे संस्थापक अध्यक्ष विदुरा उर्फ नानासाहेब नवले यांच्या नेतृत्वाखालील सर्वपक्षीय शेतकरी विकास पॅनलने पुन्हा एकदा दणदणीत विजय मिळविला.

नवले यांच्या हिंजवडी ताथवडे गटातूनच कासरसाईचे माजी सरपंच बाळासाहेब भिंताडे यांनी माघार न घेतल्याने एका जागेसाठी निवडणूक लागली होती. यामध्ये भिंताडे यांना दारुण पराभवाला सामोरे जावे लागले. त्यांचा सामना उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली केलेल्या सर्वपक्षीय शेतकरी विकास पॅनलचे नेते विदुरा नवले यांच्यासह दत्तात्रय गोपाळ जाधव व चेतन हुशार भुजबळ यांच्याशी झाला. यामध्ये विदुरा विठोबा नवले यांना (८५२४) मते, दत्तात्रय गोपाळ जाधव (८३८०) मते, चेतन भुजबळ यांना (७१८९) मते मिळाली. तर अपक्ष उमेदवार बाळासाहेब भिंताडे यांना केवळ २५०५ मते मिळाली.

२०२५ ते२०३०कालावधीसाठी झालेल्या संचालक मंडळाच्या निवडणुकीसाठी शनिवारी पाचही तालुक्यातील ५७ मतदान केंद्रावर एकूण मतदान ९५१५ मतदारांनी मतदान केले होते. त्यापैकी ११२ मते बाद झाल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी मुकूंद पवार यांनी घोषित केले. प्रत्येक उमेदवाराला पडलेली अंतिम मत व निकाल त्यांनी घोषित केला. यावेळी विजयी उमेदवारांच्या समर्थकांनी दणदणीत विजयाबद्दल आनंदोत्सव साजरा केला. निकालानंतर नवनिर्वाचित संचालक मंडळाने नवले यांचे अभिनंदन करत पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार केला. निवडणूक प्रक्रिया सुरळीत व पारदर्शकपणे पार पाडल्याबद्दल कारखान्याचे माजी उपाध्यक्ष बापू भेगडे यांनी अधिकाऱ्यांचे तसेच उपस्थित शेतकरी सभासदांचे आभार मानले. यावेळी सहाय्यक निवडणूक अधिकारी म्हणून सर्जेराव कांदळकर, सचिन सरसमकर, बाळकृष्ण घुगे, उमेश थिटे, संगीता चौधरी, मंदार कुलकर्णी, सुनंदा शिंदे सचिन भिडे व कारखान्याचे व्यवस्थापकीय संचालक साहेबराव पठारे यांनी काम पाहिले.

# विविध क्षेत्रांतील आव्हानांना नवकल्पना हेच उत्तर : ॲड.आशिष शेलार



पुणे (प्रतिनिधी):''आजच्या आधुनिक युगात विविध क्षेत्रांतील आव्हानांवर मात करण्यासाठी नवकल्पनाच हा सर्वोत्तम मार्ग आहे. मात्र या नव कल्पनांना पोषक वातावरण व व्यासपीठांची सतत गरज आहे. त्यामुळेच अशा व्यासपीठांचे विकेंद्रीकरण झाले पाहिजे,जेणेकरून समाजाच्या तळागाळातील कल्पना देखील पुढे येतील,''असे प्रतिपादन राज्याचे माहिती-तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी आज येथे केले.


उद्योजकतेला प्रोत्साहन देण्यासाठी राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या पुढाकाराने कोथरूड येथील एमआयटी विश्वशांती विद्यापीठाच्या प्रांगणात 'पुणे स्टार्टअप एक्स्पो २०२५'चे आयोजन करण्यात आले. यावेळी दीपप्रज्वलनाने या प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. या वेळी ॲड.शेलार यांच्या हस्ते सर्वोत्तम २४ स्टार्टअप्सना सन्मानित करण्यात आले.

डेस्टिनेशन को वर्किंग, पुणे बिझनेस अँड इन्फ्रास्ट्रक्चर ग्रुप, टीडीटीएल, एमआयटी विश्वशांती विद्यापीठ यांच्या संयुक्त सहकार्याने या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. या वेळी चंद्रकांत पाटील, डॉ. राहुल कराड, डॉ. आर. एम. चिटणीस, डॉ. सिद्धार्थ चक्रवर्ती, अमृता व मंदार देवगांवकर, डेटा टेकचे संचालक अमित आंद्रे आदी मान्यवर उपस्थित होते.

''भारतीय राज्यघटना प्रत्येक नागरिकाला समान संधी व संरक्षणाची हमी देते. त्याला अनुसरून शहरी व ग्रामीण भागांतील नवकल्पनांना व्यासपीठ मिळणे आवश्यक आहे. अशा स्टार्टअप प्रदर्शनांमुळे नवकल्पनांची वास्तवातील चाचणी होते आणि आत्म निर्भर भारताच्या दिशेने मोठा टप्पा गाठला जातो,''असेही शेलार यांनी सांगितले.

यावेळी चंद्रकांत पाटील यांनी कोविड काळात स्टार्टअप्सच्या संकल्पना कशा समोर आल्या, याचा मागोवा घेतला. ''वर्क फ्रॉम होम संस्कृतीत डेस्टिनेशन को वर्किंगने महत्वाची भूमिका बजावली असून, त्यात कार्यरत सुमारे दीडशे व्यावसायिकांच्या चर्चांतून स्टार्टअप एक्स्पोची कल्पना उदयास आली,'' असेही त्यांनी नमूद केले.

एक्स्पोच्या संयोजिका अमृता देवगांवकर,मंदार देवगांवकर व अमित आंद्रे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.गार्गी कुलकर्णी यांनी केले.




# फार्माथॉन २.० ला उत्स्फूर्त प्रतिसाद; ६ हजारहून अधिक धावपटूंचा सहभाग




पुणे (प्रतिनिधी) : आरोग्यविषयक जनजागृतीसाठी लहू बालवडकर सोशल वेल्फेअर व इंडियन फार्मास्युटिकल असोसिएशन, पुणे शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित फार्माथॉन २.० ही भव्य मॅरेथॉन स्पर्धा रविवारी बालेवाडी येथील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुलात पार पडली. या उपक्रमात तब्बल ६ हजारहून अधिक धावपटूंनी सहभाग घेत उत्साहात मॅरेथॉन पूर्ण केली.

फार्मासिस्ट, औषध उत्पादक, महाराष्ट्रातील ८५ फार्मसी महाविद्यालये, राज्य अन्न व औषध प्रशासन (एफडीए), केमिस्ट असोसिएशन, ड्रग इन्स्पेक्टर आदी घटकांनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदविला. या उपक्रमाचे आयोजन भाजपचे शहर चिटणीस लहू बालवडकर यांच्या पुढाकारातून करण्यात आले.

स्पर्धेत ३ किमी, ५ किमी, १० किमी आणि २१ किमी असे विविध गट होते. या स्पर्धेचे संयोजन (आयपीए) पुणे शाखेच्या टीमने केले. संयोजनात डॉ.सत्यानारायण (चेअरमन), डॉ.रविंद्र कांबळे (व्हाईस चेअरमन),प्रा.प्रविण जावळे (ऑर्गनायझिंग सेक्रेटरी) आणि सागर पायगुडे (जॉइंट सेक्रेटरी) यांचा समावेश होता.

कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी डॉ. संजय चोरडिया, डॉ.सोहन चितलांगे, मा.बापू बांगर, मा.गिरीश हुकारे, डॉ.राकेश सोमानी, मा.सचिन कांबळे आदी मान्यवर उपस्थित होते.

सिद्धार्थ जाधव, प्राजक्ता हनमघर आणि पर्ण पेठे या मराठी चित्रपटसृष्टीतील सेलिब्रिटींनी उपस्थित राहून धावपटूंना प्रोत्साहन दिले.

फार्माथॉन २.० हा उपक्रम केवळ एक मॅरेथॉन न राहता, फार्मा क्षेत्रात आरोग्य व व्यायामाचे महत्त्व अधोरेखित करणारा सामाजिक संदेश देणारा उपक्रम ठरला.

# श्री क्षेत्र बनेश्वर येथील रस्त्यासाठी खा.सुप्रिया सुळे यांचे पुणे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण




पुणे (प्रतिनिधी): खासदार सुप्रिया सुळे यांचं पुणे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन व उपोषण केले.भोर तालुक्यातील श्री क्षेत्र बनेश्वर येथील बनेश्वर फाटा ते वनविभाग कमान या पवित्र देवस्थानकडे जाणाऱ्या रस्त्याची अवस्था अतिशय दयनीय झाली आहे. या रस्त्याची दुरुस्ती करावी यासाठी वारंवार पाठपुरवठा करुनही शासन आणि प्रशासन दुर्लक्ष करत आहे. शासनाच्या या कारभारावर तीव्र नाराजी व्यक्त करत सुळे यांनी आंदोलन केले.

भर उन्हात सुप्रिया सुळे या आंदोलनाला बसल्या, ऊन तापत असताना अद्यापही कोणत्याही शासकीय अधिकाऱ्याने या आंदोलनाची दखल घेतलेली नाही. सुप्रिया सुळे यांनी बुधवारी जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे येथे उपोषणाला सुरुवात केली. यावेळी त्यांनी, 'आम्ही रस्ता दुरुस्तीची वारंवार मागणी करतो आहोत पण याची दखल घेतली जात नाही, तारीख पे तारीख दिली जात आहे. पीएमआरडीएच्या आयुक्तांनी दिलेली डेडलाइन मागेच उलटून गेली. परंतु अद्यापही तेथे रस्त्याचे कोणतेही काम पूर्ण झालेले नाही. बनेश्वर फाटा ते वनविभाग कमान या देवस्थानाकडे जाणाऱ्या रस्त्याला प्रचंड खड्डे पडले असून रस्त्याची दुरवस्था झाल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस, पालकमंत्री अजित पवार यांच्या निदर्शनास आणून दिले आहे. हा रस्ता भाविकांना ये-जा करण्यासाठी अतिशय महत्त्वाचा आहे. त्याची दुरवस्था झाल्याने भाविकांना तसेच स्थानिकांना देखील मोठा त्रास सहन करावा लागत आहेत. मात्र वारंवार मागणी करुनही प्रशासन जाग होत नाही. असा आरोप सुळेंनी यावेळी केला.

तसेच, जोपर्यंत बनेश्वर रस्त्याच्या विषयावर प्रशासन ठोस भूमिका घेत नाही तोपर्यंत आम्ही आंदोलन चालू ठेवणार असल्याचे सुळे म्हणाल्या. या देशात करोडो रुपये खर्च करून मेट्रो होते पण दीड किलोमीटरचा रस्ता होत नाही हे दुर्दैव आहे. गेले सहा महीने झाले आम्ही या रस्त्यासाठी पाठपुरावा करतो आहे. पण हे प्रशासन आमच्याकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप खासदार सुप्रिया सुळे यांनी यावेळी केला.

हे साप्ताहिक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादीका श्रीमती.विनिता दत्तात्रय सुर्वे यांनी श्री समर्थ प्रिंटर्स, ६८० बुधवार पेठ, पुणे-४११००२(दूर-०२०-२९९५०६१५) येथे छापून,१०/६४,पी.एम.सी. कॉलनी,शास्त्रीनगर,पौड रोड,कोथरूड,पुणे-४११०३८ येथे प्रसिध्द केले.दूर-९७६५६२६८२८,८२०८२६०४७१,या अंकात प्रसिध्द झालेल्या लेखांशी,मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही .पुणे न्यायालयीन कक्षेत-संपादक,पिंपरीचिंचवड कार्यालय-द्वारा-श्री.संतोष मुरलीधर माचुत्रे,शिवनेरी निवास,केशवनगर,प्लॉट नं.४,विवेक वसाहत,चिंचवडगाव,पुणे-४११०१८
Email-mulshidinank@gmail.com, mulshidinank@rediffmail.com, dattasurve27@gmail.com | No.SDM/PUNE/SR/489/2021 कार्यकारी संपादक-श्री.केतन दत्तात्रय सुर्वे